**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बाबासाहेब अमृत माळी
१४०३, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिध्दी,
ता. पारनेर, जि. अहमदनगर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
भ्रष्टाचार विरोधी वन आंदोलन न्यास, राळेगणसिध्दी,
ता. पारनेर, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३२/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. बाबासाहेब अमृत माळी<br>१४०३, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्याने दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसही ते उपस्थित नव्हते.

भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यास, राळेगण सिध्दी या न्यासाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती अपूर्ण दिली, मुद्देनिहाय माहिती दिली नाही. दिलेली माहिती व त्यात नमूद केलेल्या निर्णयानुसार प्रत्यक्ष कार्यवाही यात तफावत आहे. न्यासाचे प्रमुख श्री. अण्णा हजारे यांच्या दौऱ्याच्या वेळी जनतेकडून घेतल्या जाणाऱ्या देणग्यांची नोंद किर्दीला घेण्यात येते का नाही, याची स्पष्ट माहिती दिली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी पुढील अपील कोणाकडे करावे हे उत्तरात नमूद केले नाही, त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडेच अपील केले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. बाबासाहेब अमृत माळी यांनी केले.

श्री. माळी यांनी मागितलेल्या माहितीवर विहित मुदतीत उत्तर पाठविले. त्यांनी शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी यांच्या पत्रव्यवहारावरुन दिसते. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात मुद्देनिहाय नेमकेपणा व अपिलीय प्राधिकाऱ्यांचा तपशील देणे आवश्यक आहे. भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यासाच्या निर्णयानुसार कार्यवाही न झाल्याचे श्री. माळी यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. श्री. माळी यांच्या निवेदनातील अशा स्वरूपाच्या मुद्दयांचा विचार करणे-न-करणे ही न्यासाच्या अखत्यारीतील बाब आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र किसन कांबळे
मु.नरळेवाडी, पो.वाकी(शिवणे), ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे-६ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र किसन कांबळे
मु.नरळेवाडी, पो.वाकी(शिवणे), ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे-६ श्री.ज.मं.संट

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग, सोलापूर श्री.ग.ब.निलवाणी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.८.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रोजगार हमी योजनेखालील पाझर तलाव आदिंबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर मिळाली नाही. आपण दारिद्र्यरेषेखाली असून शिधापत्रिकेत तसे नमूद आहे. त्यामुळे माहिती नि:शुल्क मिळणे आवश्यक असताना दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रामचंद्र किसन कांबळे यांनी केले.

श्री.कांबळे यांनी तीन वर्षाच्या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली आहे. दारिद्र्यरेषेखालील यादीत त्यांचा समावेश आहे की नाही, याबाबत तहसील कार्यालयाकडे विचारणा केली होती. परंतु त्याचे उत्तर अद्याप आलेले नाही. श्री.कांबळे यांनी मागितलेली माहिती देण्यासाठी रु.५२,५२५/- एवढा खर्च येईल. त्यामुळे प्रत्यक्ष अभिलेख पाहून नेमकी माहिती मागणी केल्यास देण्यास सुलभ होईल, असे श्री.कांबळे यांना कळविले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीच्या वेळीही तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी व तोंडी स्वरूपात तशा सूचना दिल्या होत्या. परंतु श्री.कांबळे यांनी हा पर्याय स्वीकारला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.ग.ब.निलवाणी व अपिलीय प्राधिकारी श्री.ज.मं.संट यांनी संबंधित पत्रांच्या प्रतींसह केले.

आपण दारिद्र्यरेषेखाली असून कार्यकर्ता म्हणून काम करतो. स्वत:च्या मालकीचे घर आहे व दोन एकर शेती आहे, असे श्री.कांबळे यांनी आयोगाच्या विचारणेनुसार नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नेताजी गारे यांनी माहिती नाकारलेली नाही. माहिती विस्तृत असल्यामुळे व श्री.कांबळे यांच्या दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशाबाबत निश्चिती न झाल्यामुळे माहिती देण्याबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापी, अपीलकर्त्याचे निवेदन लक्षात घेता श्री.कांबळे यांनी अभिलेखांचे अवलोकन करावे व जन माहिती अधिकाऱ्यांनी १०० पृष्ठांपर्यंतची माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापी, आपल्याला यानुसार माहिती दि.२६.१२.२००८ अखेर मिळाली नसल्याची तक्रार श्री.कांबळे यांनी दि.२६.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. आयोगाने त्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून खुलासा मागविला. श्री.कांबळे यांनी अभिलेखांच्या अवलोकनाबाबत व माहिती देण्याबाबत आपल्या कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही, त्यामुळे नेमकी कोणती माहिती हवी हे समजून येत नाही. त्याबाबत त्यांना पत्र पाठवूनही प्रतिसाद दिलेला नाही, असे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)विभाग, सोलापूर यांनी दि.३.३.२००९ च्या पत्रान्वये सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांनी दि.२३.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. त्यासोबत सादर केलेला पत्रव्यवहार लक्षात घेता, श्री.कांबळे यांची तक्रार रास्त नाही. तसेच अभिलेख अवलोकनासाठी न जाता तक्रार करण्याची त्यांची कृती योग्य नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १२.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जयवंत महादेव पोवार
२६३४, बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरूकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

१. **जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
२. शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जयवंत महादेव पोवार
२६३४, बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरूकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. हिंदुराव कोळेकर

१. **जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
श्री. शि. ह. भोसले
२. शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय कोल्हापूर
श्री. शु. दे. अलगौडर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एका भ्रष्टाचारी कर्मचाऱ्याची माहिती आपण मागितली होती, परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी चार वेळा सुनावणी घेऊनही निश्चित निर्णय दिला नाही, त्यामुळे संबंधितांवर शास्तीसह कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जयवंत महादेव पोवार यांनी केली.

वैयक्तिक सेवापुस्तक, गोपनीय अहवाल, मालमत्ता व दायित्व अशा स्वरुपाच्या व इतर वैयक्तिक माहितीची मागणी श्री. पोवार यांनी केली होती. माहिती तयार असल्याचे वारंवार कळवूनही त्यांनी माहिती नेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगरभूमापन अधिकारी, कोल्हापूर श्री. शि.ह.भोसले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

श्री. पोवार यांनी वैयक्तिक आरोप करून ढोबळ मानाने माहिती मागितली आहे. तसेच 'कारवाई का केली नाही,' अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले आहेत. देय माहिती तयार असूनही व समक्ष अभिलेख पाहण्यास कळवूनही येत नाहीत, हे संबंधित पत्रव्यवहारातून स्पष्ट होते. तरीही नियमानुसार योग्य ते शुल्क आकारून माहिती देण्याचा निर्णय त्यांचे अपील अंशतः मान्य करुन दिला. निर्णय मिळाला नाही, हे अपीलकर्त्याचे निवेदन योग्य नाही , असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. हिंदुराव कोळेकर यांनी केले.

शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती अभिलेखाचे समक्ष अवलोकन करुन अपीलकर्त्यास दुसऱ्या दिवशी (दि.१९.१२.२००८) द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १९.१२.२००८ रोजी श्री. पोवार यांनी श्री. सुरेश गायकवाड, बी वॉर्ड सर्व्हेअर यांच्या संबंधातील मूळ सेवा पुस्तक

व वैयक्तिक धारिकेची पाहणी करून मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकला दि. २४.१२.२००८ रोजी पुरविण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला . मात्र काही माहितीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या, असे श्री. पोवार यांनी नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून श्री. पोवार यांची तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. १६.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जयवंत महादेव पोवार
२६३४, बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरूकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**१. जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
२. शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जयवंत महादेव पोवार
२६३४, बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, साठमारी रोड,
गुरूकृपा स्टेशनर्स जवळ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. हिंदुराव कोळेकर

**१. जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर
श्री. शि. ह. भोसले
२. शिरस्तेदार, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय कोल्हापूर
श्री. शु. दे. अलगौडर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एका भ्रष्टाचारी कर्मचाऱ्याची माहिती आपण मागितली होती, परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी चार वेळा सुनावणी घेऊनही निश्चित निर्णय दिला नाही, त्यामुळे संबंधितांवर शास्तीसह कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जयवंत महादेव पोवार यांनी केली.

वैयक्तिक सेवापुस्तक, गोपनीय अहवाल, मालमत्ता व दायित्व अशा स्वरुपाच्या व इतर वैयक्तिक माहितीची मागणी श्री. पोवार यांनी केली होती. माहिती तयार असल्याचे वारंवार कळवूनही त्यांनी माहिती नेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगरभूमापन अधिकारी, कोल्हापूर श्री. शि.ह.भोसले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

श्री. पोवार यांनी वैयक्तिक आरोप करून ढोबळ मानाने माहिती मागितली आहे. तसेच 'कारवाई का केली नाही,' अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले आहेत. देय माहिती तयार असूनही व समक्ष अभिलेख पाहण्यास कळवूनही येत नाहीत, हे संबंधित पत्रव्यवहारातून स्पष्ट होते. तरीही नियमानुसार योग्य ते शुल्क आकारून माहिती देण्याचा निर्णय त्यांचे अपील अंशतः मान्य करुन दिला. निर्णय मिळाला नाही, हे अपीलकर्त्याचे निवेदन योग्य नाही , असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. हिंदुराव कोळेकर यांनी केले.

शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती अभिलेखाचे समक्ष अवलोकन करुन अपीलकर्त्यास दुसऱ्या दिवशी (दि.१९.१२.२००८) द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १९.१२.२००८ रोजी श्री. पोवार यांनी श्री. सुरेश गायकवाड, बी वॉर्ड सर्व्हेअर यांच्या संबंधातील मूळ सेवा पुस्तक

व वैयक्तिक धारिकेची पाहणी करून मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकला दि. २४.१२.२००८ रोजी पुरविण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला . मात्र काही माहितीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या, असे श्री. पोवार यांनी नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून श्री. पोवार यांची तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि. १६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश आ.गडगे — अपीलकर्ता
घर नं. ४२६/२१, मगदुम बिल्डींग, कबनुर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरदायी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुरेश आ.गडगे
घर नं. ४२६/२१, मगदुम बिल्डींग, कबनुर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५
विद्यमान श्री.टी.एन.सुपे, तत्कालीन-श्री.विनय दक्षिणदास

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५
विद्यमान श्री.ए.बी.भोसले, तत्कालीन-श्रीमती सविता फटाले

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १२.०७.२००७ (एकूण ५ अर्ज) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | १६.०७.२००७ व २७.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | ५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | ११.०२.२००८ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे.

## विवेचन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे आपण पाच अर्ज करून राज्य मंडळ, तसेच कोल्हापूर व औरंगाबाद विभागीय मंडळ यांच्याकडे माहिती मागितली होती. परंतु आपल्याला चुकीची, दिशाभूल करणारी व विलंबाने माहिती दिली. त्या त्या विभागीय मंडळांकडून माहिती घेण्यास आपल्याला जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे यांनी सांगितले. परंतु विभागीय मंडळे राज्य मंडळाच्याच नियंत्रणाखाली असल्यामुळे सर्व माहिती एकत्रित संकलित करून देण्याची जबाबदारी राज्य मंडळाच्या जन माहिती अधिकाऱ्यांची आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुरेश आ.गडगे यांनी केले.

श्री.गडगे यांनी दि.१२.७.२००७ रोजी पुणे येथे पाच अर्ज समक्ष दिले. संबंधित विभागीय मंडळांना स्वतंत्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आहेत. त्या त्या मंडळांकडे त्यांच्या संदर्भातील माहिती मागावी, असे सांगूनही श्री.गडगे यांनी राज्य मंडळामार्फत आपले अर्ज संबंधित विभागीय मंडळांकडे हस्तांतरित व्हावेत, असा आग्रह धरला. पाच अर्जांमध्ये मागितलेली माहिती व्यापक स्वरूपाची व गुंतागुंतीची आहे. तसेच त्याच काळात विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होते व 'कुमार भारती' (इयत्ता दहावी) या पुस्तकाच्या चौकशीबाबतची तातडीची कार्यवाही चालू होती. त्यामुळे संकलित स्वरूपात माहिती देण्यास दोन महिन्यांचा कालावधी लागेल, असे

श्री.गडगे यांना दि.१६.७.२००७ रोजी कळविण्यात आले. राज्य मंडळांकडील माहिती संकलित करून ती दि.२२.८.२००७ रोजी त्यांना देण्यात आली व त्या त्या विभागीय मंडळांकडील माहितीसाठी अर्ज त्यांच्याकडे वर्ग करण्यात आले. विभागीय मंडळांकडून माहिती येणे, ती तपासून आवश्यक सुधारणा करून संकलित करणे व अपीलकर्त्यास पुरविणे, अशी कार्यवाही करण्यात आली. श्री.गडगे यांच्या प्रथम अपिलाबाबतही अशाच स्वरूपाची कार्यवाही करण्यात आली. कोल्हापूर विभागीय मंडळ व औरंगाबाद विभागीय मंडळ यांचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सुनावणीस उपस्थित होते, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती सविता फटाले व विद्यमान जन माहिती अधिकरी श्री.ए.बी.भोसले यांनी केले. माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचे विस्तृत लेखी व तोंडी निवेदन पूरक कागदपत्रांसह तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ श्री.ए.डी.कांबळे, तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ श्रीमती यू.व्ही.पाटील, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ श्री.पी.एस.सुर्वे, विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ श्री.व्ही.बी.पायमल, सहाय्यक माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, औरंगाबाद विभागीय मंडळ श्री.एस.के.अधाने, अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव, औरंगाबाद विभागीय मंडळ श्री.डी.एन.कळकोटे या सर्व अधिकाऱ्यांनी केले.

प्रत्येक मंडळात स्वतंत्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी असल्याची कल्पना असूनही श्री.गडगे यांनी राज्य मंडळाकडे पाच अर्ज केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज वर्ग करणे एखाद्या अर्जाबाबत बंधनकारक आहे. मात्र अनेक ठिकाणी त्या अर्जाच्या प्रती पाठवून माहिती देण्यास कळविणे अपेक्षित नाही. राज्य मंडळ, औरंगाबाद आणि कोल्हापूर विभागीय मंडळ यांच्याकडे श्री.गडगे यांनी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते. तसेच विस्तृत माहिती मागणाऱ्या पाच अर्जांसाठी एकच अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. अनेक अर्जांसाठी एकच अपील अपवादात्मक म्हणून

दाखल करून घेण्यात आले असले तरी प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. श्री.गडगे यांनी अर्जामध्ये अनेक बाबींवर भाष्य, खुलासा, अन्वयार्थ याची मागणी केली आहे. . माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अशी मागणी विचारात घेता येणार नाही. प्रत्येक मंडळाकडून आवश्यक असलेली व न मिळालेली नेमकी माहिती कोणती याचे लेखी निवेदन भाष्य न करता श्री.गडगे यांनी प्रत्येक मंडळाला स्वतंत्रपणे सादर करावे व त्याची मूळ अर्जानुसार तपासणी करून देय माहिती संबधित मंडळांच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसात अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, औरंगाबाद विभागीय मंडळ व कोल्हापूर विभागीय मंडळ यांच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२५.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर,
उपव्यवस्थापक,
श्री दिनकररावजी नलवडे नागरी सह. पतसंस्था मर्या.,
मडिलगे बु., ता. भुदरगड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

१. **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

२. **जन माहिती अधिकारी** तथा उपव्यवस्थापक,
श्री दिनकररावजी नलवडे नागरी सह. पतसंस्था मर्या.,
मडिलगे बु. ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर
रा. मडिलगे बु., ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्यामुळे मूळ अर्जदार श्री. गणपती बळवंत देसाई यांना माहिती दिली नाही, या कारणावरून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. श्री. देसाई यांना माहिती सत्वर उपलब्ध करून देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे यांनी दिला, त्याविरूध्द अपीलकर्ता श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी कार्यक्रमास उपस्थित नसल्यामुळे दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसूनही श्री. देसाई यांना त्यांच्या संदर्भातील माहिती दिली. त्यांनी मागितलेली अन्य संस्थेच्या संदर्भातील माहिती दिली नाही. श्री. देसाई संस्थेचे सभासद नाहीत. मात्र घेतलेले कर्ज न भरता वसुली दाखल्याच्या अंमलबजावणीत विलंब व्हावा म्हणून अशा स्वरूपाचे अर्ज ते करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री. शिरोडकर यांनी केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. त्यामुळे मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांचे उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांनी केलेली कृती ग्राह्य धरण्यात येत आहे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा मूळ प्रकरणातील निर्णय रद्द करण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंद विलास सागर
समृध्दी फार्मास्युटिकल्स, ६, मेहता टॉवर,
२रा मजला, शिवाजी चौक, सोलापूर ४१३ ००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर विभाग, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.११.२००६ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीसही कोणी उपस्थित नव्हते.

अपीलकर्ता श्री. आनंद विलास सागर यांनी मागितलेली माहिती सोलापूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन या न्यासाच्या ताब्यातील असून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्या कक्षेतील नाही. त्यामुळे आपल्याकडील माहिती देण्यात आली. या न्यासामध्ये अफरातफर असल्याचा आरोप श्री. आनंद विलास सागर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केला असून त्याबाबत स्वतंत्र नियमावलीनुसार ते दाद मागू शकतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी, सोलापूर श्री. का. बा. धावारे यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अर्जुन गणपत शिंदे
२१, हडको कॉलनी, साळोखेनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अर्जुन गणपत शिंदे
२१, हडको कॉलनी, साळोखेनगर, कोल्हापूर
**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख
**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. नेत्रदिपक सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती अपुरी व विलंबाने दिली. अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अर्जुन गणपत शिंदे यांचे प्रतिनिधी श्री. विजय यशवंत घाटगे यांनी केली.

श्री. शिंदे यांनी तीन विभागांशी संबंधित व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी झालेल्या चर्चेत काही मुद्दयांच्या संदर्भात अधिक स्पष्टीकरणात्मक मुद्दयांची मागणी त्यांनी केली, तीही देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका श्री. नेत्रदिपक सरनोबत यांनी केले.

अपीलकर्ता श्री. शिंदे स्वतः माहिती घेण्यासाठी उपस्थित राहत नाहीत. मागितलेली माहिती विस्तृत असल्यामुळे वेळ लागणार असल्याचे त्यांना कळविण्यात आले होते. नियमावलीत तरतूद नसल्याबाबतची माहिती देता येणार नाही, हे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री. गणेश देशमुख यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. सुनावणी न घेता अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिल्याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार अमान्य करण्यात येत आहे. कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकाऱ्यांना आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५४+३५५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डी.जी.मळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ (अ.क्र.३५५)<br>दि.१३.१२.२००७ (अ.क्र.३५४) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.७.२००८ (अ.क्र.३५५)<br>दि.४.२.२००८ (अ.क्र.३५४) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

मिरज उपविभागामधील रस्त्यावरच्या खड्ड्यांच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती अनुक्रमे १६२ व ७३ दिवस विलंबाने दिली, म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजू बाळासाहेब गोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात व लेखी निवेदनात केली.

श्री.गोरे यांनी सन २००० ते २००७ व एप्रिल २००५ ते डिसेंबर २००७ अशा कालावधीतील माहिती मागितली होती. माहिती प्रदीर्घ कालावधीतील व संकलन करणे आवश्यक असलेली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी, सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांना संकलनाबाबत कळविले. तसेच माहिती विस्तृत असल्यामुळे देण्यास दोन महिने अधिक कालावधी लागेल, असे श्री.गोरे यांना कळविले. विलंब लागणार असल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी श्री.गोरे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेनंतर

संपूर्ण माहिती नि:शुल्क देण्यात आली. याच काळात सांगली येथे असलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, राष्ट्रपतींचा दौरा या कामामुळे कार्यालयातील कर्मचारी व उपविभाग स्तरावरील कर्मचारी जिल्हाधिकारी, सांगली यांच्या आदेशाने अनुषंगिक तयारीत कार्यरत होते, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. तथापि त्या काळातही माहिती संकलनासाठी पत्रव्यवहार करून प्रयत्न करण्यात आले. एक वेळ विलंब क्षमापित करावा, यापुढे मुदतीबाबत काटेकोरपणे पालन करण्यात येईल, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डी.जी.मळेकर यांनी केले.अपवादात्मक बाब म्हणून ते मान्य करण्यात येत असून विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५४+३५५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू बाळासाहेब गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डी.जी.मळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ (अ.क्र.३५५)<br>दि.१३.१२.२००७ (अ.क्र.३५४) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.७.२००८ (अ.क्र.३५५)<br>दि.४.२.२००८ (अ.क्र.३५४) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

मिरज उपविभागामधील रस्त्यावरच्या खड्ड्यांच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती अनुक्रमे १६२ व ७३ दिवस विलंबाने दिली, म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजू बाळासाहेब गोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात व लेखी निवेदनात केली.

श्री.गोरे यांनी सन २००० ते २००७ व एप्रिल २००५ ते डिसेंबर २००७ अशा कालावधीतील माहिती मागितली होती. माहिती प्रदीर्घ कालावधीतील व संकलन करणे आवश्यक असलेली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी, सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांना संकलनाबाबत कळविले. तसेच माहिती विस्तृत असल्यामुळे देण्यास दोन महिने अधिक कालावधी लागेल, असे श्री.गोरे यांना कळविले. विलंब लागणार असल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी श्री.गोरे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेनंतर

संपूर्ण माहिती निःशुल्क देण्यात आली. याच काळात सांगली येथे असलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, राष्ट्रपतींचा दौरा या कामामुळे कार्यालयातील कर्मचारी व उपविभाग स्तरावरील कर्मचारी जिल्हाधिकारी, सांगली यांच्या आदेशाने अनुषंगिक तयारीत कार्यरत होते, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. तथापि त्या काळातही माहिती संकलनासाठी पत्रव्यवहार करून प्रयत्न करण्यात आले. एक वेळ विलंब क्षमापित करावा, यापुढे मुदतीबाबत काटेकोरपणे पालन करण्यात येईल, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डी.जी.मळेकर यांनी केले.अपवादात्मक बाब म्हणून ते मान्य करण्यात येत असून विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. संतोष प्रभाकर घोळवे
मु.पो.तारळे, जि.प.केंद्रशाळा, तारळे,
ता.पाटण, जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुल्यमापन अधिकारी,
मुल्यमापन विभाग, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. राम इथापे

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. महावीर दामोदर माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.४.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. संतोष प्रभाकर घोळवे यांनी डी.एड. परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळावी व उत्तर पत्रिका पुन्हा तपासावी, अशी मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांच्याकडे केली होती.

उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचे राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने ठरविले असून त्याच्या सत्यप्रती देऊ नये, असा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे श्री. घोळवे यांना उत्तरपत्रिका नाकारण्यात आली. तसेच उत्तरपत्रिकेची पुन्हा तपासणी, पुनर्मूल्यांकन करणे याची नियमात तरतूद नसल्यामुळे या मागणीची दखल घेता येणार नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी, तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. राम इथापे यांनी केले. उत्तरपत्रिकांच्या प्रती न देण्याबाबतच्या कारणांचे सविस्तर निवेदन त्यांनी सादर केले. मात्र परीक्षा पध्दतीतील पारदर्शकतेच्या दृष्टीने उत्तरपत्रिका गोपनीय आहेत, असे मानता येणार नाही. अपुरा कर्मचारीवर्ग आणि परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या ही कारणे परीक्षा पध्दतीतील पारदर्शकतेच्या आड येता कामा नयेत, याची समज आयोगाने सुनावणीच्या वेळी दिली. मात्र उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनाची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. संतोष प्रभाकर घोळवे
मु.पो.तारळे, जि.प.केंद्रशाळा, तारळे,
ता.पाटण, जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुल्यमापन अधिकारी,
मुल्यमापन विभाग, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. राम इथापे

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. महावीर दामोदर माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.४.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. संतोष प्रभाकर घोळवे यांनी डी.एड. परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळावी व उत्तर पत्रिका पुन्हा तपासावी, अशी मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांच्याकडे केली होती.

उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचे राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने ठरविले असून त्याच्या सत्यप्रती देऊ नये, असा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे श्री. घोळवे यांना उत्तरपत्रिका नाकारण्यात आली. तसेच उत्तरपत्रिकेची पुन्हा तपासणी, पुनर्मूल्यांकन करणे याची नियमात तरतूद नसल्यामुळे या मागणीची दखल घेता येणार नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी, तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री. राम इथापे यांनी केले. उत्तरपत्रिकांच्या प्रती न देण्याबाबतच्या कारणांचे सविस्तर निवेदन त्यांनी सादर केले. मात्र परीक्षा पध्दतीतील पारदर्शकतेच्या दृष्टीने उत्तरपत्रिका गोपनीय आहेत, असे मानता येणार नाही. अपुरा कर्मचारीवर्ग आणि परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या ही कारणे परीक्षा पध्दतीतील पारदर्शकतेच्या आड येता कामा नयेत, याची समज आयोगाने सुनावणीच्या वेळी दिली. मात्र उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनाची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी, **अपीलकर्ता**
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता, **उत्तरवादी**
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ७, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६१ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच आवश्यक शुल्क (रु. २०/- चे वैध मुद्रांक) जोडलेले नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७ -११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती शामराव चव्हाण
मु.पो.सुरूर, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१,
पुणे-मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१ यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६२ / सातारा / २०० |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१ . १ .२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१,
पुणे-मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, पुणे-१ तत्कालीन-श्री.उत्तमराव पाटील
**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१ यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, पुणे-१ श्री.मधुकर नवले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.११.२००७ व १२.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे.

## विवेचन

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासाठी भूसंपादन झालेल्या क्षेत्राची अनुसूची न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.मारूती शामराव चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग यांचे कार्यालय, पुणे-१ यांनी अनूसूचीच्या प्रती सही-शिक्क्याच्या नकलेसह दिल्या नाहीत, असे श्री.चव्हाण यांनी अपील अर्जात म्हटले आहे.

श्री.चव्हाण यांनी मागितलेली माहिती शासन राजपत्र भाग-अ मधील असून त्याच्या प्रती त्यांना दिल्या. या राजपत्रावरूनच तलाठी नोंद घालत असतात. त्यात दुरूस्ती करण्याची श्री.चव्हाण यांची मागणी असून तसा अधिकार आपल्या कार्यालयाला नाही. गाव कामगार तलाठ्यांना लिहिलेल्या पत्राची प्रत तलाठ्याकडून उपलब्ध करून घेऊन नंतर देण्यात आली व सर्व माहिती सही-शिक्क्यासह श्री.चव्हाण यांच्या पत्रानंतर पुन्हा दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१ यांचे कार्यालय, पुणे श्री.मधुकर नवले यांनी केले. ते रास्त असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१०.११.२००९